# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक

नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २४

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **सोमवार दिनांक २९/०९/२०२५ सकाळी ११-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ३. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ४. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| ८. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता, पाणीपुरवठा |
| ९. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १०. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| ११. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १२. | श्री प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम |
| १३. | श्री एन.के.बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १४. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १५. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १६. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १७. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष समिती प्रमुख |
| १८. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| १९. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २०. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१९३ मोहाडी उपनगर येथे व्यायाम शाळा विकास अनुदान योजना अंतर्गत व्यायाम शाळा बांधणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा हददीतील मोहाडी उपनगर येथील सिसनं. १४८३ ही जागा मनपा मालकीची असुन त्या ठिकाणी अस्तित्वातील व्यायामशाळा ही पडक्या स्वरुपाची असुन सदर कामासाठी १०० टक्के अनुदान म. जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, धुळे यांच्याकडुन प्राप्त होणार आहे. सदर कामी मे. महासभेचा ठरावाची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झाला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९३ दिनांक २९/०९/२०२५**

धुळे म.न.पा. हद्दीतील मोहाडी उपनगर येथील सि.स.नं. १४८३ ही जागा मनपा मालकीची असून त्या ठिकाणी अस्तित्वातील व्यायाम शाळा ही पडक्या स्वरुपाची असून सदरील व्यायाम शाळा ही नव्याने बांधणे आवश्यक आहे. तरी सदरील व्यायाम शाळा नव्याने बांधणे कामी म. जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, धुळे यांचे मार्फत व्यायाम शाळा विकास अनुदान योजना अंतर्गत नुतनीकरण करणेस निधी देण्यास तयार आहे. परंतु सदर व्यायसामशाळा नुतनीकरण (बांधकाम करणे) करणे कामी धुळे महानगरपालिका महासभेच्या ठरावाची प्रतची मागणी केलेली आहे. त्यामुळे तरी सदरील व्यायाम शाळा व्यायाम शाळा विकास अनुदान योजना अंतर्गत मंजुरी मिळणे कामी मे. महासभेचा ठराव होवून प्रस्ताव म. जिल्हा क्रिडा अधिकारी, कार्यालय, धुळे यांचेकडे पाठविणेबाबत कळविले आहे.

उक्त बाबत धुळे म.न.पा. हद्दीतील मोहाडी उपनगर येथील सि.स.नं. १४८३ या मनपा मालकीच्या जागेवर व्यायाम शाळा बांधणेसाठी म. जिल्हा क्रिडा अधिकारी, कार्यालय, धुळे यांचे मार्फत निधी प्राप्त होणार आहे. तरी व्यायाम शाळा विकास अनुदान योजना अंतर्गत काम करणे कामी मे.महासभेचा ठरावाची आवश्यकता असल्याने नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून मे.महासभेपुढे पाठविणे कामी बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

म.नगररचनाकार, नगररचना विभागा कडील अभिप्राया नुसार, सदरील मिळकत हि अस्तित्वातील बांधकाम असल्याचे दिसून येते व वि.यो. नुसार व्यायाम शाळा बांधकाम अनुज्ञेय आहे. तसेच सदर जागेवर बांधकाम करणेबाबत बांधकाम विभाग, धुळे मनपा मार्फत कार्यवाही करणे योग्य होईल असे कळविले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, मोहाडी उपनगर येथे व्यायाम शाळा विकास अनुदान योजना अंतर्गत व्यायाम शाळा बांधणे बाबतचा प्रस्ताव म. जिल्हा क्रिडा अधिकारी, कार्यालय, धुळे यांचेकडे सादर करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१९४ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० च्या अनुषंगाने स्वच्छ सर्व्हेक्षण २०२५, माझी वसुंधरा अभियान ६.० तसेच घनकचरा नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणी करीता तांत्रीक सल्लगार म्हणुन नियुक्त केलेल्या अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना मुदतवाढ करीता आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपायुक्त मागील वेळेस ६ महिने मुदतवाढ दिली होती. त्यांचा कार्यकाळ ऑगस्ट महिन्यात संपला आहे. ऑगस्ट पासुन पुढे मुदतवाढ कामी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक गव्हर्नमेंट अंडरटेकिंग आहे. म्हणुन मुदतवाढ देणेत येत आहे. मागील दराप्रमाणेच कार्यादेश द्यावे.

मा.उपायुक्त यात १ कर्मचारी वाढवला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक मुदत संपल्याच्या कालावधीपासून पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देणेत येत आहे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९४ दिनांक २९/०९/२०२५**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० चा कालावधी दिनांक १ ऑक्टोंबर २०२१ ते १ ऑक्टोंबर २०२६ असा स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० म्हणुन वाढविण्यात आला आहे. उक्त अभियानाची अंमलबजावणी करणेकामी अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना तांत्रीक सल्लागार म्हणुन मंजुर दर मासिक रु.२,२५,०००/- प्रमाणे माहे १ नोव्हेंबर-२०२२ खालील कामे करण्याकामी तांत्रीक सल्लागार म्हणुन नेमण्यात आलेले होते.

धुळे महानगरपालिके अंतर्गत होणाऱ्या कामांची अर्बन डेव्हलपमेंट यांच्याकडुन दखल घेतली जाते. स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२५ चे केंद्र शासनामार्फत क्षेत्रीय तपासणी पुर्ण झाल्याने राज्य शासनामार्फत माझी वसुंधरा ५.० ची कार्यवाही होणार असल्याने यावर धुळे मनपा मार्फत प्रभावीपणे अंमलबजावणी करुन धुळे मनपाचे मानांकन मिळविणे आवश्यक होते. त्याकरीता सदर संस्थेस माहे फेब्रुवारी-२०२५ ते जुलै-२०२५ पावेतो मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सद्यस्थितीत माझी वसुंधरा अभियान ६.० ची कार्यवाही सुरु झालेली आहे. तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२६ संदर्भात शासनाकडुन प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांनी मुदतवाढ करीता पत्र सादर केले आहे.

अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत होणाऱ्या कामाची निकड पहाता तसेच धुळे महानगरपालिकेला स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या कामकाजा करीता तांत्रीक सल्लगार म्हणुन सहाय्य आवश्यक आहे. तसेच मनपाकडे पुरेसे तांत्रीक कर्मचारी अपुर्ण असल्यामुळे सदरचे कामकाज करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. तरी अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना मागील कामाचा अनुभव पहाता त्यांच्याकडुन कामे करणे आवश्यक आहे.

अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांच्याकडुन उक्त कामे करुन घेतल्यास मंजुर दर प्रती महिना रु.२,२५,०००/- दर मंजुर आहेत. त्यानुसार उक्त संस्थेस माहे ऑगस्ट-२०२५ पासुन पुढील १ वर्षाकरीता मुदतवाढ देवुन वरील कामे करुन घेणे आवश्यक असुन माहे ऑगस्ट-२०२५ पासुन पुढील १ वर्षाकरीता मुदतवाढ मिळण्यास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० च्या अनुषंगाने स्वच्छ सर्व्हेक्षण २०२५, माझी वसुंधरा अभियान ६.० तसेच घनकचरा नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणी करीता तांत्रीक सल्लगार म्हणुन नियुक्त केलेल्या अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना मागील मंजूर दराप्रमाणे माहे ऑगस्ट २०२५ पासून पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१९५ | महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तांचे भाडेपट्टाद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण) नियम २०२३ च्या प्रभावी अंमलबजावणी करीता अधिसुचना, मार्गदर्शक सुचना व नियमानुसार कार्यवाही करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| मा.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| मा.सहा.आयुक्त | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९क अन्वये म. आयुक्त यांना महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पटटयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल, अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल असे नमुद आहे. त्यानंतर अधिग्रहीत करुन शासनाने अधिसुचना जारी केली होती. ६ नोव्हेंबर २०२३ रोजी त्या समिती गठीत करण्याबबात आलेले आहे. त्यात मालमत्ता भाडयाने देण्याची कार्यपध्दती, नुतनीकरण हे होते. त्यानंतर पुन्हा सुधारीत मार्गदर्शक सुचना ७ नोव्हेंबर २०२३ निर्गमित झाल्या. त्यातसुध्दा कार्यवाहीचे निर्देश दिले आहे. यापुर्वी भाडेपटटा कालावधी १० वर्षांचा होता. त्यात पुन्हा सुधारणा करण्यात येवुन ३० वर्षापर्यंत वाढवता येईल असे निर्देश आहे. ३० वर्षे किंवा सामंजस्याने ठरवुन ३० वर्षे असे नमुद आहे. आणि या समितीची अध्यक्ष मा. आयुक्त तथा प्रशासक हे आहेत. २०० गाळेधारकांची मुदत संपली आहे. यापुर्वीही गाळेधारक, ओटेधारक यांची मुदत संपली आहे. याबबात निर्णय घेणेकामी विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे. याअगोदर न २०१६ मध्ये ठराव क्र. २२२ मे. महासभेने पारित केला होता. जे जुन्या दराने भाडे आकारले होते ते रेडीरेकनर दराने आकारणी करावी आणि ज्या गाळयांची मुदत संपली ते मनपा ताब्यात दिलेले नाही. त्याची दुप्पट आकरणी करावी. त्याअनुषंगाने भाडे दुप्पट, प्रॉपर्टी टॅक्स दुप्पट, जीएसटी दुप्पट, शास्ती दुप्पट परंतु आता सुधारीत समितीपुढे गेले. त्यांनी मागचा फरक भरला तर नविन करारनामा होईल. नंतर त्यांना १ पटाची आकारणी राहील. याअनुषंगाने हा प्रस्ताव सादर झाला आहे. |
| मा.आयुक्त तथा प्रशासक | ज्यांनी ज्यांनी पैसे भरले त्यांना समितीपुढे जाऊन बाजार विभागाला त्यांचे मुदतवाढ प्रपोजलवर कार्यवाही करता येईल. जे गाळेधारक पैसे भरतील त्यांनाच मुदतवाढीसाठी कंसीडर केले जाईल. म्हणजे मनपाचे जनरल बॉडीचे अधिकार समितीकडे आले आहे. मग पैसे कसे वसुल होतील व आता स्वस्तिक टाकी येथे गाळेधारकांकडुन किती पैसे गोळा झाले. व हस्तांतरणाचे केसेस किती आहे. |
| मा. सहा.आयुक्त | यातुन साधारण ५० लाख भरणा झाला आहे. २३ गाळेधारकांपैकी १० ते १५ लोक आहेत. हस्तांतरणाचे रक्कम व अनामत आपल्याला मिळेल.यापुर्वी मिळालेली नाही. |
| मा.आयुक्त तथा प्रशासक | शासनामार्फत नियुक्त झालेली कमिटीकडुन हे प्रोसेस करुन घ्यावे. ज्यांच्या कोर्ट केसेस आहे ते विथड्रॉ करत असतील यापध्दतीने वर्कआऊट करता येईल. आपण ६ महिनेपासुन शास्तीमाफी राबवित आहेत. २५ कोटी वसुल झाले. मागील वर्षी आपण शास्ती माफी दिलेली नव्हती. जवळ जवळ २८ हजार प्रॉपर्टी धारकांनी घरपटटी भरली आहे. हे करत असतांना मनपाचे उत्पन्न वाढीचे मार्ग म्हणुन नाही पण काही गोष्टी राहुन गेलेल्या आहेत. ज्या मधल्या काळात झाल्या नव्हत्या म्हणुन ही मुदतवाढ देत होतो. आता गाळयांच्या बाबतीत शास्ती माफी आहे. स्वस्तिक चित्रमंदिराजवळील गाळेधारकांची मुदत २०२२ मध्ये संपली होती. आपला २०१६ च्या ठरावाप्रमाणे ज्यांना मुदतवाढ दिली नाही किंवा ज्यांनी घेतली नाही. त्यांना रेडीरेकनर प्रमाण दुप्पट दर लावावा. ३० वर्षे पासुन त्यांच्या ताब्यात गाळे होते ते असणारे भाडे आणि आताचे असणार भाडे यात खुप फरक आहे. नाहक मनपाचे रेव्हेन्यु अडकुन गेला आहे. या प्रोसिजरमध्ये हा विषय घेण्यामागचे कारण हेच होते. पुढील मुदतवाढीचा मार्ग जे पैसे भरतील त्यांच्यासाठी ओपन होईल. आणि मुदतवाढ देण्याचे अधिकार शासन नियुक्त समितीला आहे. आणि मनपाच्या महासभेचे अधिकार राहीले नाही. |

साधारण अजुन गाळेधारक लोकं येतील यामुदतवाढीच्या हिशोबाने तेवढयापुरती एक वेळची मुदतवाढ आपण देवु. गाळेधारकांना देतो तशी प्रॉपर्टीधारकांनाही देतोय. ३१ ऑक्टोबर पर्यंत ही मुदतवाढीसाठी संधी देवु. त्यानंतर शास्ती माफी राहणार नाही. ही मनपाच्या इतिहासातील लॉंगटर्म शास्तीमाफी असेल. जुन ते सप्टेंबर या ४ महिन्यात जवळ जवळ २५ कोटी रुपयांचा टॅक्स आपल्याकडे भरणा केला आहे. पाणीपटटीची बिले याच बिलात दिल्यामुळे पाणीपटटीत देखील ३ कोटीची वसुली झाली आहे. भरणा वाढला आहे. ३१ ऑक्टोबरनंतर कुठलीही मुदतवाढ आपण देणार नाही. याच सोबत रेग्युलराईजेशनच्या कामावर आपण फोकस करतोय. गुंठेवारी रेग्युलराईजेशनचे ठराव झाले आहे. डीपीचे पण एक्सटेंडेड एरियाचे शेवटच्या टप्प्यात आले आहे. प्रभाग रचनेची कामे संपली आहे. आता गुंठेवारी रेग्युलरायजेशच्या मागे लागा. ज्या नोटीफाईट स्लम आहेत त्या स्लममध्ये काही लोकांनी कॉम्प्लेक्स बांधुन टाकले. १५०० स्के.फुट च्या वर रेग्यलरायजेशनला स्कोन नाही. जागा नावावर करुनउपयोग नाही. झालेले बांधकाम पण रेग्युलराईज करावे लागणार आहे. त्यामुळे पटटेवाटप झाले म्हणजे सर्व रेग्युलराईज झाले असे होत नाही. मनपाकडे त्याचे प्रशमन शुल्क, विकास शुल्क तुम्हाला भरुन घ्यावे लागेल. आणि मग ते रेग्युलराईज होतील. म्हणजे तो पुढे प्रधानमंत्री आवास योजनेच्या टप्पा क्र. २ किंवा दुस-या कुठल्या योजनेला एलिजिबल राहिल. मनपाचा रेव्हेन्यु म्हणुनयाकडे लक्ष केंद्रीत करावे. या १५ दिवसात नगररचना इंजिनियर आणि अतिक्रमण विभाग प्रमुख यांनी रिपोर्ट द्यावा की किती मनपाच्या ओपनस्पेसवर अतिक्रमण आहे. अतिक्रमण निर्मुलनाची मोहिम पुढील कालावधीत घ्यायची आहे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९५ दिनांक २९/०९/२०२५**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ क अन्वये म. आयुक्त यांना महानगर पालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल असे नमुद आहे.

अधिसुचनेनुसार महाराष्ट्र शासनाने क्र.नामपा-१२२१/प्र.क्र./१६६ / नवि -२६ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (महा १९४९ चा ५९) चे कलम ४५६ (अ) चे पोटकलम (१) सहकलम ७९ (क) चे परंतु क अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ अधिक्रमीत करून उक्त अधिनियमातील कलम ४५६ (अ) चे पोटकलम (२) अन्वये यापुर्वी प्रसिध्द करण्यांत आल्यानुसार शासनाने नियम तयार केले आहे.

उक्त नियम राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे तारखेपासुन लागु राहतील हे नियम महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टयाने हस्तांतरित करणे, भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणे, महानगरपालिकेच्या मान्यतेने त्रयस्थ पक्षास उपभाडेपट्टयाद्वारे हस्तांतरित करणे या करीता लागु राहतील असु नमुद आहे.

विषयांकित नियम २०२३ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत शासनाने अतिरिक्त मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. भाडे कालावधी संदर्भात सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

सद्यस्थितीत **(अ)** धुळे महानगरपालिका ठराव क्र. ३८ दि.१३-४-१९९२ अन्वये १० व्यापारी संकुलातील गाळे व जागा भोगवटादारांची मुदत सन २०२२ मध्ये संपलेली आहे.

**(ब)** सन २०१० पासुन काही व्यापारी संकुलातील गाळे व जाग भोगवटादारांची मुदत संपली आहे पैकी काही संकुलातील भोगवटादारांची प्रकरणे मे. न्यायालयात प्रलंबीत आहे.

**१.**याअगोदर मुदत संपलेल्या गाळे व जागा करिता रेडिरेकनर दराने भाडे घेणेबाबत धुळे महानगरपालिकेने ठराव क्र. २२२ दि. ११-२-२०१६ मंजुर केलेला आहे.

**२.**रहिवास घराकरिता रेडिरेकनर दराने भाडे घेणेबाबत ठराव क्र. २२३ दि. ११-२-२०१६ मंजुर केलेला आहे.

**३.**ठराव क्र. २२४ दि. ११-२-२०१६ नुसार रेडिरेकनर दराने हस्तांतरण फी वसुल करणेस मंजुरी दिलेली आहे.उक्त ठरावानुसार कार्यवाही सुरू आहे.

उक्त बाबींबाबत निर्णय झाल्यास मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे. यास्तव सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तांचे भाडेपट्टाद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण) नियम २०२३ च्या प्रभावी अंमलबजावणी करीता शासनाच्या अधिसुचना, अतिरिक्त मार्गदर्शक सूचना, सुधारित मार्गदर्शक सुचना व नियमानुसार कार्यवाही होणेसाठी मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे, जागा, ओटे, कोठे यांना भाडे व अनामत रक्कम निश्चीती करुन मुदतवाढ देणे तसेच हस्तांतरण प्रक्रीया करणे,करारनामा करणे तसेच या संदर्भातील इतर अनुषंगीक कार्यवाहीकरणे इत्यादी बाबींबाबत निर्णय घेणेसाठीचे अधिकार गठीत समितीकडे देण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१९६ — धुळे महानगरपालिका मालकीच्या खुली जागेत स्वखर्चाने जाहिरात फलक उभारणी करुन जाहिरातीसाठी वापरणे कामी वार्षिक जाहिरात परवाना शुल्क, जागा भाडे, लायन्स फी भरुन नविन होडिंग उभारणे मंजुरी करीता विषय महासभे पुढे मान्यतेस्तव फेरसादर.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.प्र.भांडारपाल — धुळे शहरात यापुर्वी २२२ होर्डींग होते. परंतु घाटकोपर व वडाळा येथे दुर्घटना घडुन जीवीत हानी झाल्यामुळे अनेक होर्डींग मनपामार्फत निष्कासीत करण्यात आलेले आहेत. यामुळे आता धुळे शहरामध्ये आपण जागेचा सर्वे केला आहे. तर शहरात एकुण ९५ जागा होत्या. मागील सभेत आयुक्त महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार फेरतपासणी करुन ४५ जागा त्यात समाविष्ट केल्या आहेत. सर्वे केलेल्या एकुण १३७होर्डींग लावणेकरीता जागा उपलब्ध आहेत. तसेच मागील फलकांची दर व नव्याने निश्चीत केलेल्या जागांचे दर समान असणे गरजेचे आहे. मान्यतेस्तव विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — काय काय करणार त्यात तुम्ही

मा. उपायुक्त — आपण ज्या जागा निश्चीत केल्या आहे. त्या जागांचे जे स्क्वेअर फुटांचे दर आहे त्यानुसार निविदा प्रसिध्दीस देतो. त्यानंतर जे दर येतील त्यातील महत्तम दर असेल त्यांना मंजुरी घेतल्यानंतर त्यातुन दरवर्षी आपले उत्पन्न वाढेल आणि जे अनधिकृत बोर्ड लागतात त्यांची संख्या कमी होईल व उत्पन्नात भर पडेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक — पुढील कार्यवाही करावी जो रेट ठरेल ते भाडे निर्धारण कमिटीपुढे ठेवुन त्यांना मान्यता घेवुन पुढील कार्यवाही करावी. हे करतांना जेथे बोर्ड लावण्यास मनाई त्याची खबरदारी घ्यावी. शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे ज्या जागा योग्य त्याच ठिकाणी बोर्ड लावावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९६ दिनांक २९/०९/२०२५**

धुळे महानगरपालिका शहरात उपलब्ध स्वमालकीच्या खुली जागेवर स्वखर्चाने जाहिरात होडिंग उभारणी करुन जाहिरात प्रसिध्द करणेसाठी जाहिरात परवाना शुल्क, जागा

भाडे, लायन्स परवाना फी, वसुल करणेत येते या करीता सदर होडिंग या खाजगी मालक यांनी लावलेले आहेत.

सदर शहरातील यापुर्वी स.न.२०१५-१६ पासुन २२२ नग होडिंग अस्तीत्वात होते सदर होडिंग मधुन अनेक होडिंग धारक यांनी स्वता:हुन होडिंग काढुन घेतले आहेत काही होडिंग विकास कामाना अडचणीच्या होत असल्यामुळे महानगरपालिके मार्फत काढणेत आलेल्या आहेत. तसेच दिनांक १३/०५/२०२४ रोजी घाडकोपर वडाळा येथे होडिंग पडुन दुर्घटना घडुन जिवीत हानी झालेली आहे. त्यावेळेस संबधित होडिंग धारक यांचे (Structural Audit) नसल्यामुळे अनेक होडिंग महानगरपालिके मार्फत निष्कशीत करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे शहरात भरपुर अशा जागा उपलब्ध आहेत.

सदर शहरातील अनाधिकृत अशा संपुर्ण होडिंग काढणेत आलेल्या आहेत. त्यामुळे शहरात धुळे महानगरपालिका स्वमालकीच्या खुली जागा उपलब्ध असुन सदर जागेवर खाजगी ठेकेदार नियुक्त करुन त्यांचे स्वखर्चाने जाहिरात होडिंग उभारणी करणे करीता परवानगी दिल्यास त्यामध्ये महानगरपालिका उत्पन्न मध्ये वाढ होऊन आर्थिक फायदा होणार आहे.

तसचे जाहिरात फलकाचा आकार, अंतर व उंची याबाबत सर्वसाधारण नियम :- (१) जाहिरात फलकांचा प्रमाण आकार(प्रस्तावात नमूद अ.क्र.१ ते ११ नुसार) निश्चित करणेत आलेले आहेत.

तसेच सदर होडिंग करीता जाहिरात कर, जागा भाडे, अनामत रक्कम व नुतनीकरण फी हे दर स.न.२०१५-१६ मध्ये दर निश्चित करणेत आलेले होते तेच दर स.न २०२२-२०२३ मध्ये जाहिरात परवाना शुल्क म्हणुन निश्चित करणेत आलेले होते. सदर १० (दहा) वर्षापासुन कुठल्याही प्रकारचे दर वाढ करणेत आलेली नाही. तरी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.९ मे २०२२ चे सुचने मधील (२०) जाहिरात परवाना शुल्क ३(तीन) वर्षानंतर चलन वाढ दरांनुसार निश्चित करावी असे आदेशीत केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ४५६ अ च्या पोट कलम (१) यासह आणि कलम २४४, २४५ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन धुळे महानगरपालिकेच्या क्षेत्रात व्यवसाय व बांधकाम मध्ये मोठया प्रमाणात होणारी वाढ व त्यानुसार जाहिरात क्षेत्रापासुन मिळणारे उत्पन्न विचारात घेता धुळे महानगरपालिकेस जाहिरात परवाना शुल्कात दर ३ (तोन) वर्षाने वाढीव सुधारणा करणे आवश्यक आहे असा ठराव महासभा क्र.१ प्रशासक ठराव क्र.६ दि.२५/०१/२०२४ ने मान्यता देण्यात आलेली आहे.

नविन जाहिरात फलक परवानगी उभारणी करीता ३(२) (क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामच्या कमल ७९ च्या आणि या नियमाच्या तरतुदीना अधिन राहुन महानगरपालिका निविदा मागवुन महानगरपालिका जमीनीवर पोटनियम (१) मध्ये नमुद केलेल्या विभिन्न स्वरुपातील जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी परवाना देता येईल त्यासाठी जाहिर निविदा मागविणेआवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे साईज शासनाने निश्चित केलेल्या आहेत यामध्ये कुठलाही बदल करावायाचा नाही व विहित आकराहुन मोठया आकाराच्या जाहिरात फलकास परवानगी देण्यात येणार नाही.

नविन जाहिरात फलक परवानगी (घ) सार्वजनिक खुली जागा म्हणजे मनोरंजनाची मैदाने, क्रीडांगण, उद्याने बगिचे (छ) नदी पत्रात, तलावात, कॅनॉल, जलाशयात, नाल्या मध्ये कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

तसेच धुळे महानगरपालिका प्रशासक ठराव क्र.६ मधील मान्यते प्रमाणे महाराष्ट्र महानगपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) नुसार धुळे शहरातील उपलब्ध असलेल्या खुली जागावर असलेल्या होडिंग करीता वार्षिक जाहिरात परवाना शुल्क प्रती चौरस फुट रुपय २२ अक्षरी रुपये (बाविस) हा आकारण्यात येत आहे.

तसेच धुळे महानगरपलिकेचे असलेले दर व ईतर महानगरपालिकेचे दर लक्षात घेता धुळे महानगपालिका हद्दीत अस्तीत्वात आलेले होडिंग चे दर व वाढीस उपलब्ध असलेल्या खुली जागेवर होडिंग लावणेस मान्यता मिळाल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात जास्तीचे जास्तीचे उत्पन्न मिळणार आहे.

तसेच जाहिरात विभाग मार्फत धुळे महानगरपालिका हद्दीत असलेल्या स्व: मालकीचे जागेची तपासणी करणेत आलेली असुन प्रस्तावात एकूण १ ते ५४ जागा फलक संख्या ९५ फलकांचे ठिकाणे व मोजमाप तसेच संख्या नमूद आहे.सदर बाबत प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर केला असता त्याबाबत विभागामार्फेत हद्दवाढ गावातील भागासह शहरातील सर्व जागा पुनश्च पडताळणी व पाहणी करुन अजुन जांगाची निश्चिती करावी व त्यानुसार सुधारीत अहवाल सादर करावा असा निर्णय घेण्यात आलेला होता. जाहिरात विभाग मार्फेत शहरात नविन ११ हद्दवाढ गावाची तपासणी करणेत आली असता प्रस्तावात नमूद एकूण १ ते २१ जागा तसेच फलकांचे मोजमाप व फलक संख्या एकूण ४२ ठिकाणी याजागेवर होडिंग लावणेस जागा उपलब्ध आहेत.

तरी प्रस्तावात नमुद जागा व हद्दवाढ नविन एकुण ४९००० चौ.फु.जागा निश्चित करुन त्यावर नविन होडिंग लावणेस मान्यता मिळवुन जुने दर व नविन प्राप्त दर समान करणेस प्रस्ताव पुनश्च मे. महासभेपुढे फेरसादर करण्यात आलेला आहे.

तसेच मागील १० (दहा) वर्षापासुन दर वाढ न केलेल्या जुने अस्तीत्वात असलेले होडिंग व नविन उपलब्ध असलेल्या खुली जागेवर होडिंग लावणेस जाहिरात निविदा व्दारे प्राप्त झालेले जास्तीत जास्तचे दर समान करणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र शासन राजपत्र नगर विकास अधिसुचना ९ मे २०२२ अन्वये असलेले सर्व नियम मान्य करणे बंधनकारक राहील.

तरी वरील नमुद केलेल्या जागा निश्चित करुन त्यावर नविन होडिंग लावणेस मान्यता मिळवुन जुने दर व नविन प्राप्त दर समान करणेस मान्यता मिळवुन त्याकरीता ई-निविदा प्रसिध्द करणेस सदरचा विषय महासभे पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार प्रस्तावात नमूद केलेल्या धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या निश्चीत केलेल्या जागांना व शासननिर्णयानुसार निश्चीत केलेल्या प्रस्तावात नमूद एकूण १ ते ११ फलकांच्या मोजमापास मान्यता देणेत येत आहे.

तसेच नव्याने निश्चीत केलेल्या प्रस्तावात नमूद फलक संख्या ९५ व ४२ एकूण १३७ याठिकाणी स्वखर्चाने जाहिरात फलक उभारणी करुन जाहिरातीसाठी वापरणे कामी वार्षिक जाहिरात परवाना शुल्क, जागा भाडे, लायन्स फी भरुन नविन होडिंग उभारणे कामी विहीत नियमानुसार ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच नविन निविदा दर प्राप्त झाल्यानंतर यापूर्वी असलेल्या जाहिरात फलकासाठी असलेली आकारणी (रु.२२ प्रति चौ.फुट) रद्द करुन नविन निविदा दर प्राप्त झाल्यानंतर त्या दराप्रमाणे सर्व जाहिरात फलकांसाठी समान आकारणी करण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१९७ — धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ कामी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील वखार महामंडळाचे गोडावून भाड्याने घेणे व त्याठिकाणी अनुषंगिक व्यवस्था करणेकामी होणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता — धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम म. राज्य निवडणुक आयोग यांचे पत्र दि.१४/०७/२०२५ अन्वये शहरातील मतदानाकरीता व मतदान यंत्रे सिल करणे, वाटप करणे व मतमोजणी करणे कामी शासकीय बंदिस्त जागा आवश्यक असते. त्यामुळे शहरातील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पारोळारोड येथे जागेची पाहणी केली असता ही जागा

उपलब्ध होवु शकते. सदर जागेसाठी गोदाम भाडे व येणारा आवश्यक तो खर्चाकरीता सदरचा विषय मे. महासभेपुढेसादर करण्यात आलेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.उपायुक्त — परवा सदरच्या जागेची पाहणी केली. तेथे २ गोडावुन उपलब्ध आहे. एका गोदामाची लांबी व रुंदी ही पुरेशी आहे. मतमोजणीसाठी त्यालाच लागुन गोडवुन नं. ५ आहे त्याची लेंग्थ जास्त आहे. ते गोडावुन स्ट्राँग रुम मळणुन वापरता येवु शकते. त्यामुळे मतमोजणी व स्ट्राँगरुम जवळ असल्यामुळे हे फायद्याचे ठरणार आहे. यंत्र वाटपासाठीदेखील मोकळी जागा आहे. तेथे बसेस व इतर वाहने मोबीलाईज करणे सोप ठरणार आहे. आणि गोदाम बंदिस्त आहे. दोन्ही साईडने कंपाऊंड आहे. तरी पोलिस प्रशासनाकडुन अहवाल मागविणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आपण यासाठी पोलिस अधिक्षकांना पत्र दिले आहे. त्या भागातील पोलिस निरीक्षकांना दाखवुन त्यांच्याकडुन अहवाल घ्यावा. तसेच पीडब्लुडी चा देखील अहवाल घ्या. सगळयांचे सेफ अहवाल आले तर ठरावाची प्रत जोडुन निवडणुक आयोगाला मान्यतेसाठी पाठवावे लागेल. तेथे मोठा रुम आहे त्याला स्ट्राँग रुम बनवावा. त्याला लागुन असलेल्या गोडावुनला मतमोजणीचे काम करता येईल. पोलिंग पार्टी तेथुनच डिस्पॅच करता येईल व रिसिव्हींग तेथेच केले तर जास्तीची दगदग होणार नाही. पोलिस व पीडब्लुडीचे रिपोर्ट आल्यावर लगेच प्रस्ताव पाठविण्याची कारवाई करावी. या आठवडयात ही कामे प्राधान्याने करावी. तेथील लाईट व इतर अनुषंगीक व्यवस्था करावी लागेल. त्याचा आढावा घ्यावा. होणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देण्यात येत आहे. मतदान यादी व मतदान केंद्र यासाठी कामाला लागावे. काही मतदान केंद्र हे फक्त महिलांसाठी राखीव करा असे आदेश आहेत. ज्या प्रभागात ३ ते ४ मतदान केंद्र आहे त्यातील एक पिंग पोलिंग बुथ करावे. डागडुजी संदर्भात सर्व गोष्टी कराव्या. सर्व केंद्रावर वेबकास्टींग होणार आहे. संवेदनशील केंद्र व अतिसंवेदनशील पोलिंग बुध यासाठी वेबकास्टींग कराव्या लागणाऱ्या गोष्टी त्याच्या तयारी कराव्या. डिसेंबर मध्ये इलेक्शन होईल या हिशोबाने पुर्वतयारी करावी. सर्वांनी अलर्ट राहुन जी जी कामे सोपवली ती लक्षपुर्वक पार पाडावी. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९७ दिनांक २९/०९/२०२५**

धुळे मनपा सार्वत्रिक निवडणूकची कार्यक्रम म.राज्य निवडणूक आयोग यांचे कडील पत्र क्र- रानिआ / मनपा — २०२५ / प्र.क्र. ३ / का-५ यांचे दि.२६/०६/२०२५ व पत्र क्र.रानिआ / इव्हीएम-२०२५/ प्र.क्र. ७ / का-१४ दि.१४/०७/२०२५ पत्रान्वये अन्वये कळविणेत आले आहे. त्याकरीता मतदान यंत्र सिल करणे , वाटप करणे व मतमोजणी करणे करीता शासकीय बंदिस्त जागा आवश्यक आहे. त्याकरीता या अगोदरच मनपा सार्वत्रिक निवडणुकी करीता नगावबारी , देवपूर या ठिकाणी शासकीय गोदाम उपलब्ध होत आहे. परंतु सदर जागेची विचारणा केली असता ते उपलब्ध होणार नसल्याबाबत पाहणी दरम्यान सांगणेत आले.

त्यामुळे शहरा मधील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ , पारोळा रोड , धुळे येथील गोदाम पाहणी अंती उपलब्ध होवू शकते त्याकरीता सदरील कार्यालयाकडून गोदाम क्र.१ व गोदाम क्र. ५ चे शुल्काबाबत विचारणा केली होती त्यानुसार संबंधित विभागामार्फत पत्र सादर झालेले आहे. यात खालील बाबी नमूद आहे.

1.गोदाम भाडे वखार महामंडळाच्या प्रसिद्ध शेड्युल क्र. ५९ नुसार रु.१७.४० पैसे अधिक GST प्रती महिना चौ.फुट आते असून बाहेरील मोकळया जागेचे भाडे रु.५.३० पैसे प्रती चौ.फुट राहील.

2. यात गोदाम क्रमांक 1 एकूण क्षेत्रफळ ७६५४.६६ चौ.फुट मासिक भाडे १,३३,१९१ + GST सह तसेच गोदाम क्रमांक ५ एकूण क्षेत्रफळ ६९४४.३३ चौ.फुट मासिक भाडे १,२०,८३१ + GST असे एकूण **२,५४,०२२/-** + GST या प्रमाणे राहील

3.खुल्या जागेचे भाडे आपल्या वापरानुसार आकारण्यात येईल.

4.सदर कामकाजाकरीता लागणा-या वीज, पाणी ह्या सुविधा धुळे मनपास उपलब्ध करुन घ्याव्या लागतील.

5.सदरील गोदाम खाली करण्याकरीता सध्यास्थितीत गोदामात असलेला माल इतर गोदामात स्थलांतर/वाराफेरी करण्याकरीता येणारा खर्च धुळे मनपास करावा लागेल.

6. महामंडळाच्या उत्पन्नाचा स्त्रोत वखार भाडे असुन, वखार भाडे महामंडळास महिण्याच्या सुरवातीला नियमित मिळणे अपेक्षित असल्याचे कळविण्यात आलेले आहे.

तसेच सदर गोदाम उपलब्ध झाल्यास त्याठिकाणी जागा बंदिस्त करणे, CCTV यंत्रणा, अग्निप्रतिबंधक यंत्रणा, परिसरातील इतर अनुषंगिक कार्यवाही यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास व वरीलप्रमाणे लागणारे गोदाम व इतर जागा व आवश्यक कामासाठी पत्रात नमूद दरानुसार येणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरीसाठी मे.महासभेच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने मे. महासभेपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ कामी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील वखार महामंडळाचे गोडावून ठराविक कालावधीसाठी भाड्याने घेणे व त्याठिकाणी विद्युत, अग्निरोधक यंत्रणा तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने व मा.राज्य निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार अनुषंगिक व्यवस्था करणेकामी होणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत पोलिस विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच संरचना स्थिरता अहवाल घेण्यात येऊन मा. राज्य निवडणुक आयोगाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.

तसेच धुळे मनपा सार्वत्रीक निवडणुक २०२५ कामी निवडणुक निर्णय अधिकारी यांच्यासाठी निश्चीत केलेल्या कार्यालयांमध्ये आवश्यक ती दुरुस्ती, व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी होणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**